<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३९/२०१७ मधील निशाणी क्रमांक ३६ वर आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश १८ नियम ३अ प्रमाणे दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांचा बचाव व कैफियत पाहता प्रतिवादी यांनी शेवटी साक्ष देणे सोपे होणार आहे. प्रतिवादी यांच्या कैफियतीमध्ये नमुद नोंदी व घटनाक्रम याप्रमाणे या प्रतिवादी यांना त्याच्या पुराव्यासाठी अन्य साक्षीदार तपासणे गरजेचे आहे. त्याचे विवेचन प्रतिवादी यांनी परिच्छेद २ मध्ये दिलेले आहे. न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीने अंतिम साक्ष देणे योग्य होणार आहे. सबब, सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केला आहे.

०३. वादी यांनी निशाणी ३६ वरच त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. वादी यांच्या कथनानुसार अर्जातील नमुद कारण संयुक्तीक नाही. सदरचा अर्ज वेळकाढूपणासाठी केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यासाठी विनंती केली.

०४. प्रतिवादी यांनी निशाणी क्रमांक ३७ वर त्यांचा लेखी युक्तीवाद दाखल केला. वादीतर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही. प्रतिवादीतर्फे दाखल युक्तीवादात प्रतिवादीने कैफियतीतीलच कथने सांगून युक्तीवादातील कलम १४ मध्ये अर्जाच्या अनुषंगाने विवेचन केले आहे. लेखी युक्तीवाद अभिलेखावर असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर कथने येथे नमुद केली नाहीत. प्रतिवादी यांनी *संजय बरडे व इतर वि. विमल बैराम व इतर, २०००(३) ऑल एम.आर.*

१०७ हा न्यायनिर्णय त्यांच्या कथनापृष्ठयर्थ अभिलेखावर दाखल केला.

०५. दिवाणी प्रकिया संहीता १९०८ चे आदेश १८ नियम ३अ याचा विचार करता सर्वसाधारणपणे पक्षकारांना साक्ष देण्याची असल्यास ती इतर साक्षीदारांच्या आधी देणे गरजेचे आहे. मात्र, सदर नियमानुसार न्यायालयाच्या आदेशाने इतर साक्षीदार यांच्या साक्षीनंतर पक्षकार स्वत: साक्ष देवू शकतो. त्याअनुषंगाने विचार करता प्रतिवादी यांनी निशाणी क्रमांक ३६ वरील अर्जात असे नमुद केले आहे की, कैफियतीतील नोंदी व घटनाक्रम यांचा विचार करता क्रमाने साक्षीदार नोंदवून प्रतिवादी यांची साक्ष सर्वात शेवटी नोंदविणे न्यायाच्या दृष्टीने इष्ट होणार आहे. वादी यांनी घेतलेल्या हरकतीवरुन वादीच्या कथनानुसार दिलेले कारण संयुक्तीक नाही. मात्र प्रतिवादी यांच्या लेखी युक्तीवादातील कलम १४ चा विचार करता प्रतिवादीने दिलेले कारण संयुक्तीक दिसते. वादी यांच्या कथनानुसार सदर अर्ज वेळकाढूपणासाठी दिलेला आहे. मात्र प्रतिवादी यांनी साक्षीदारांचा क्रम निश्चितपणे दिलेला आहे. त्यामुळे वादीच्या या कथनात तथ्य वाटत नाही.

०६. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या संजय बरडे या न्यायनिर्णयात मा. न्यायालयाने न्यायनिर्णयातील परिच्छेद ०५ मध्ये नमुद केलेले तीन मुद्दे चर्चेसाठी घ ेतले होते. त्याअनुषंगाने न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ०८ मध्ये न्यायालयाने असे निरिक्षण नोंदविले आहे की, इतर साक्षीदारांच्या आधी पक्षकारांनी स्वत: साक्ष देणे हा सर्वसाधारण नियम आहे. तो बंधनकारक नसून दिशादर्शक आहे. तसेच सदर न्यायनिर्णयाचा परिच्छेद १२ मध्ये मा. न्यायालयाने असे नमुद केले आहे की, आदेश १८ नियम ३ अ प्रमाणेची परवानगी उशिरानेही देण्याचे अधिकार न्यायालयास आहेत. मी, आदरपुर्वक नमुद करतो की, सदर न्यायनिर्णयातील न्यायतत्व माझेवर बंधनकारक आहे. मी वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादीने अर्ज मंजूर करण्यास संयुक्तीक कारण दाखविले आहे. त्याचबरोबर प्रतिवादीनेच दाखल केलेल्या संजय बरडे या न्यायनिर्णयातील परिच्छेद १२ मधील न्यायतत्त्वाचाही येथे

उल्लेख करणे गरजेचे आहे. सदर न्यायतत्वानुसार प्रतिवादी हे त्यांना मिळालेल्या हक्काचा गैरवापर करणार नाहीत अथवा पुराव्यातील त्रुटी भरुन काढणार नाहीत याबाबत दक्षता घेणे गरजेचे आहे.

०७. वर नमुद विवेचनाचा समग्रपणे विचार करता प्रतिवादीचा अर्ज फेटाळण्यास कोणतेही संयुक्तीक कारण नाही. त्याअनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी यांचा निशाणी ३६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी यांनी त्या अनुषंगाने साक्षीदारांची यादी अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादी यांचा पुरावा द्यावा. |

सही/—
( प्रितेश देशपांडे )
**सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पेण.**

दि. २७.११.२०२१
पेण